## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक
## अंतर्गत संज्ञापन पत्र


**प्रेषक :** प्रा.विजयकुमार पाईकराव
**विषय :** मोहन हिराबाई हिरालाल श्रद्धांजलीपर आदिवासी पेसा कायदा १९९६ ची फलश्रुती परिसंवाद अहवाल इतिवृत्त

**प्रति :** मा. कुलगुरू
**दिनांक :** ०७/०२/२०२५

उद्दिष्टे: माहितीसाठी/ विचारार्थ/मंजुरीसाठी/सूचना/निर्णयार्थ/कृतीसाठी/अवलोकनार्थ फिरविणे

गाव विकास चळवळीचे प्रमुख प्रेरक ( मेंटोर ) दिवंगत मोहन हिराबाई हिरालाल यांचे निधना निमित्त त्यांच्या कार्यानंदावर आधारित अनोखी श्रद्धांजली **'आदिवासी लोकांसाठी पेसा कायदा १९९६ ची फलश्रुती'** या विशेष परिसंवाद यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनात यशावाणी वेब रेडीओवर आयोजित करण्यात आला होता.

**त्याचे मा.कुलगुरू मान्यता पत्र :**



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२
Ph. :0253-2231714,15 Ext 2002 http://-ycmou.digitaluniversity.ac
E-mail: mwkchair@ycmou.ac.in
**महाकवी वामनदादा कर्डक**

**प्रेषक :** प्रा.विजयकुमार पाईकराव
**प्रति :** मा. कुलगुरू
**विषय :** यशवाणी वेब रेडीओ प्रसारणा बाबत ...
**दिनांक :** २५/०१/२०२५

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासना तर्फे **आदिवासी पेसा कायदा १९९६ ची फलश्रुती** या विषयवार, यशवाणी वेब रेडीओवर. **गावहक्काचा पुरस्कर्ता** मोहन हिराबाई हिरालाल यांचे निधना निमित्त श्रद्धांजलीपर परिसंवाद.
**१. प्रा.धम्मरत्न जावळे २. डॉ.दीपक सोनावणे ३.डॉ. पन्नालाल दुर्वे**, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांचा आयोजित करण्याचा मानस आहे. त्यास मान्यता द्यावी ही विनंती. आदर व आभारासह !!!

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख,
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

मान्य
25/1/25


मा.कुलगुरू

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/228
दि. 25/ 1 /2025

या परिसंवादात विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील शैक्षणिक संयोजक मा.श्री. धम्मरत्न जावळे, मा.डॉ. दीपक सोनवणे, मा.डॉ. पन्नालाल धुर्वे व शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या श्रीम. हेमलता कामडी -चौधरी यांनी परिसंवादक सहभाग घेतला.यामध्ये पुढील मुद्यांवर चर्चा झाली.

'दिल्ली मुंबई मावा सरकार - मावा नाटे माटे सरकार' अर्थात 'दिल्ली मुंबई आमचे सरकार - आमच्या गावात आमचेच सरकार' या चळवळीचे आधारस्तंभ असलेले आणि विदर्भातील लेखा मेंढा (गडचिरोली) गावाला देशपातळीवर ओळख निर्माण करून देणारे मोहन हिराबाई हिरालाल यांचे अलीकडेच नागपूर येथे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. ग्राम स्वराज्याच्या या अनोख्या प्रयोग साधकाला, त्यांनी केलेल्या रचनात्मक कार्यानंदाला श्रद्धांजली म्हणून विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांच्या संयोजनाखाली सदर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता . त्यात परिसंवादात सुरुवातीला डॉ. दीपक सोनवणे यांनी दिवंगत मोहन हिराबाई हिरालाल यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला.

**तज्ञ परिसंवादकांचे आमंत्रण पत्र :**



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_edu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231472

शिक्षणशास्त्र विद्याशाखा / School of Education

**महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन** दिनांक : २७/०१/२०२५

प्रति.

मा. श्री. प्रा. धम्मरत्न जावळे , शै. संयोजक , मानव्यविद्या व सामजिकशास्त्रे विद्याशाखा
मा. श्री. डॉ.दीपक सोनवणे , शै.समन्वयक , मानव्यविद्या व सामजिकशास्त्रे विद्याशाखा
मा. श्री. डॉ. पन्नालाल दुर्वे , शै.समन्वयक , मानव्यविद्या व सामजिकशास्त्रे विद्याशाखा

**विषय** : यशवाणी वेब रेडिओ परिसंवाद व्याख्यान निमंत्रणपत्र ..

महोदय,

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने आयोजित दि २७ जानेवारी २०२५. भारतीय सौर माघ ७ शके १९४६ रोजी दुपारी ३ .०० वाजता " **आदिवासी पेसा कायदा १९९६ ची फलश्रुती** " या विषयावर **गावहक्क पुरस्कर्ता मोहन हिराबाई हिरालाल यांचे श्रद्धांजली निमित्त विशेष परिसंवाद - व्याख्यान** आयोजित केले आहे तरी आपण यशवाणी वेब रेडिओ येथे अभ्यासपूर्ण व्याख्यान द्यावे . ही विनंती

आदर व आभारासह ! मनपूर्वक धन्यवाद !

लोभ आहेच वृद्धी व्हावी...!!!

YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY NASHIK

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

प्रत,

मा.संचालक, मानव्यविद्या व सामजिकशास्त्रे विद्याशाखा
कृपया उचित संदर्भीय नोंद व कार्यवाहीसाठी सदर

मा. डॉ. पन्नालाल धुर्वे यांनी महाराष्ट्रातील आदिवासी समुदायाची तसेच स्थानिक स्वायत्तता व स्वशासन विषयी माहिती आणि स्वअनुभव विषद  केले . त्यानंतर सहभागींनी पेसा कायद्याची व्याप्ती विषयी त्या कायद्यातील प्रकरण निहाय थोडक्यात माहिती विषद केली. त्याचबरोबर महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे संवैधानिक अधिकार, पेसा कायद्याचा ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ, ग्रामसभांचे सशक्तीकरण, संसाधनावरील हक्क, परंपरा व प्रथांना मान्यता, शोषणविरोधी सुरक्षा, पेसा कायद्याच्या अधिनियमांचे महत्व आणि वैशिष्ट्ये त्यांची अंमलबजावणी, प्रगती व आव्हाने याविषयी सदर परिसंवादात विश्लेषन  चर्चा करण्यात आली. सदर **परिसंवादाची प्रकशचित्रे :**












या परिसंवादाचे प्रास्ताविक श्री. धम्मरत्न जावळे यांनी केले तर सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले.

सदर परिसंवाद विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'यशवाणी' या वेब रेदिओवरील दस्तऐवज संग्रहण मध्ये उपलब्ध आहे. अध्ययनार्थी , अभ्यासक व इच्छुक रसिकांना आपल्या वेळेनुसार या परिसंवादाचे श्रवण करता येईल.

**मोहन हिराबाई हिरालाल यांचे चळवळीतील सहकारी साथी आणि सर्वसहमतीची निर्णय प्रक्रिया पुस्तक वृक्षमित्र चंद्रपूर/गडचिरोली चे मुखपृष्ठ :**




मेंढा (लेखा) गावात : डावीकडून तिसरे देवाजी तोफा, चौथे मोहन हिराबाई हिरालाल



# परीसंवादाकाची आभार पत्रे


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_edu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231472
शिक्षणशास्त्र विद्याशाखा / School of Education


**महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन** दिनांक : २७/०१/२०२५

प्रति.

मा. श्री. प्रा. धम्मरत्न जावळे , शै. संयोजक , मानव्यविद्या व सामजिकशास्त्रे विद्याशाखा
मा. श्री. डॉ.दीपक सोनवणे , शै.समन्वयक , मानव्यविद्या व सामजिकशास्त्रे विद्याशाखा
मा. श्री. डॉ. पन्नालाल दुर्वे , शै.समन्वयक , मानव्यविद्या व सामजिकशास्त्रे विद्याशाखा

**विषय** : यशवाणी वेब रेडिओ परिसंवाद व्याख्यान आभारपत्र ..

महोदय,

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने आयोजित दि २७ जानेवारी २०२५. भारतीय सौर माघ ७ शके १९४६ रोजी दुपारी ३ .०० वाजता " **आदिवासी पेसा कायदा १९९६ ची फलश्रुती** " या विषयावर गावहक्क पुरस्कर्ता मोहन हिराबाई हिरालाल यांचे श्रद्धांजली निमित्त विशेष परिसंवाद - व्याख्यानात आपण यशवाणी वेब रेडिओ येथे अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.

**हा एक सुखद ज्ञान कौशल्ये क्षण**
**व्यासंगी, ज्ञानी अभ्यासपूर्ण कौशल्यानी**
**दरवळून टाकणारादाही दिशा तना मनाच्या**
**आकांक्षा आभाराची पूर्ण व्हावी**
**म्हणून हे आभार पत्र शब्द सूमन माला.**
**उजळून दे दाही दिशा आणि वाढवू दे सीमारेषा**
**१४८ कौशल्य विकासाच्या**
**तुमच्या सहकार्यशील कार्यानंदी सामुहिक**
**कर्तुत्वाच्या हिच सुमंगल कामना !**
**आदर व आभारासह ! मनपूर्वक धन्यवाद !**
**लोभ आहेच वृद्धी व्हावी...!!!**

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

MAHARASHTRA OPEN UNIVERSITY NASHIK YASHWANTRAO CHAVAN

O/C 27/1/25
27/1/25
28/1/25

**वृत्तप्रत्रातील बातमी प्रसिध्दी :**

लोकमंथन YCMOU PRO LKMN P3 070225

# मुक्त विद्यापीठात 'आदिवासी लोकांसाठी पेसा कायदा - १९९६ ची फलश्रुती' विषयी परिसंवाद

**लोकमंथन । प्रतिनिधी**



**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे 'आदिवासी लोकांसाठी पेसा कायदा - १९९६ ची फलश्रुती' याविषयी परिसंवाद आयोजित करण्यात आला. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण आणि वनाधिकार क्षेत्रातील कार्यकर्ते दिवंगत मोहन हिराबाई हिरालाल यांच्या स्मरणार्थ आयोजित या परिसंवादाचे विद्यापीठाच्या 'यशवाणी' या नभोवाणी केंद्रावरून प्रक्षेपण देखील करण्यात आले. 'दिल्ली मुंबई मावा सरकार - मावा नाटे माटे सरकार' अर्थात 'दिल्ली मुंबई आमचे सरकार - आमच्या गावात आमचेच सरकार' या चळवळीचे आधारस्तंभ असलेले आणि विदर्भातील लेखा मेंढा (गडचिरोली) गावाला देशपातळीवर ओळख निर्माण करून देणारे मोहन हिराबाई हिरालाल यांचे अलीकडेच नागपूर येथे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. ग्राम स्वराज्याच्या या अनोख्या प्रयोग साधकाला, त्यांनी केलेल्या रचनात्मक कार्यानंदाला श्रद्धांजली म्हणून विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांच्या संयोजनाखाली सदर परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यात विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील शैक्षणिक संयोजक श्री. धम्मरत्न जावळे, डॉ. दीपक सोनवणे, डॉ. पन्नालाल धुर्वे व शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या श्रीमती हेमलता कामडी - चौधरी यांनी सहभाग घेतला. परिसंवादात सुरुवातीला डॉ. दीपक सोनवणे यांनी दिवंगत मोहन हिराबाई हिरालाल यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला. डॉ. पन्नालाल धुर्वे यांनी महाराष्ट्रातील आदिवासी समुदायाची तसेच स्थानिक स्वायत्तता व स्वशासन विषयी माहिती दिली. त्यानंतर सहभागींनी पेसा कायद्याची व्याप्ती विषयी त्या कायद्यातील प्रकरण निहाय थोडक्यात माहिती विषद केली. त्याचबरोबर महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे संवैधानिक अधिकार, पेसा कायद्याचा ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ, ग्रामसभांचे सशक्तीकरण, संसाधनावरील हक्क, परंपरा व प्रथांना मान्यता, शोषणविरोधी सुरक्षा, पेसा कायद्याच्या अधिनियमांचे महत्व आणि वैशिष्ट्ये त्यांची अंमलबजावणी, प्रगती व आव्हाने याविषयी सदर परिसंवादात सांगोपांग चर्चा करण्यात आली. या परिसंवादाचे प्रास्ताविक श्री. धम्मरत्न जावळे यांनी केले तर सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. परिसंवाद यशस्वी करण्यासाठी श्री. राहुल पगारे यांनी परिश्रम घेतले. सदर परिसंवाद विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'यशवाणी' या वेब रेडिओवरील दस्तऐवज संग्रहण (अर्काईव्हज) मध्ये उपलब्ध आहे. विद्यार्थी, अभ्यासक व इच्छुक रसिकांना आपल्या वेळेनुसार या परिसंवादाचे श्रवण करता येईल.

Nashik Edition
Feb 07, 2025 Page No. 3

विजयकुमार पाईकराव
प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

**मा.कुलगुरू**